TATA
**TATA POWER**

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॉम्बे हाऊस, २४ होमी मोदी स्ट्रिट, मुंबई – ४०० ००१, भारत, टेलि.: (९१ २२) ६६६५ ८२८२,
फॅक्स: (९१ २२) ६६६५ ८८०१, वेबसाइट: www.tatapower.com सीआयएन क्र.: एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७

# सार्वजनिक सूचना

**दि टाटा पॉवर कंपनी लि. – पारेषण व्यवसायाच्या आर्थिक वर्ष २०१९–२०, आर्थिक वर्ष २०२०–२१ आणि आर्थिक वर्ष २०२१–२२ साठीच्या वार्षिक महसूल आवश्यकतेचे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०२२–२३ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०२३–२४ ते आर्थिक वर्ष २०२४–२५ या कालावधीसाठी एकूण महसुली आवश्यकतेच्या सुधारित अंदाजासाठीच्या मध्यावधी पुनरावलोकन याचिकेवरील सूचना / हरकती मागवण्याबाबत**
**(प्रकरण क्र. २०२२ चा २१७)**

१. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड – पारेषण व्यवसाय (टाटा पॉवर–टी) ने महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग (बहुवर्षीय वीजदर ) विनियम, २०१५ नुसार, आर्थिक वर्ष २०१९–२० च्या वार्षिक महसूल आवश्यकतेचे अचूक समायोजन आणि महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग (बहुवर्षीय वीजदर) विनियम, २०१९ नुसार, आर्थिक वर्ष २०२०–२१, २०२१–२२ साठीच्या वार्षिक महसूल आवश्यकतेचे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०२२–२३ च्या वार्षिक महसूल आवश्यकतेचे तात्पुरते अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०२३–२४ ते आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी सुधारित वार्षिक महसूल आवश्यकतेचा अंदाज यांच्या मंजुरीसाठी मध्यावधी पुनरावलोकन (एमटीआर) याचिका दाखल केली आहे.

२. आयोगाने प्रस्तुत याचिका दिनांक **२३ डिसेंबर, २०२२** रोजी दाखल करून घेतली आहे आणि टाटा पॉवर–टीला विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६४(२) अंतर्गत सार्वजनिक सूचना प्रसिध्द करून प्रस्तुत सूचनेद्वारे जनतेकडून सूचना/ हरकती मागवण्याचे निर्देश दिले आहेत.

३. याचिकेची प्रमुख वैशिष्टे खाली देण्यात आली आहेत. त्यातील मान्यताप्राप्त आकडेवारी प्रकरण क्र. २०१९ चा २९९ मधील महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या ३० मार्च २०२० रोजीच्या आदेशानुसार देण्यात आली आहे:

**तक्ता १: भांडवलीकरण – आर्थिक वर्ष २०१९–२०, आर्थिक वर्ष २०२०–२१ आणि आर्थिक वर्ष २०२१–२२ च्या अचूक समायोजनासाठी, आर्थिक वर्ष २०२२–२३ साठी तात्पुरत्या अचूक समायोजनासाठी आणि आर्थिक वर्ष २०२३–२४ ते आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी सुधारित अंदाज** (रूपये कोटी)

| | आर्थिक वर्ष २०१९–२० | | आर्थिक वर्ष २०२०–२१ | | आर्थिक वर्ष २०२१–२२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| **तपशील** | **मान्यताप्राप्त** | **प्रत्यक्ष** | **मान्यताप्राप्त** | **प्रत्यक्ष** | **मान्यताप्राप्त** | **प्रत्यक्ष** |
| भांडवलीकरण | ६२३.०७ | ४०६.१७ | ४३९.७६ | ७००.३४ | १५१.३२ | ४२४.९५ |

| | आर्थिक वर्ष २०२२–२३ | | आर्थिक वर्ष २०२३–२४ | | आर्थिक वर्ष २०२४–२५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| **तपशील** | **मान्यताप्राप्त** | **अंदाज** | **मान्यताप्राप्त** | **सुधारित** | **मान्यताप्राप्त** | **सुधारित** |
| भांडवलीकरण | ४४२.२६ | ८४१.६९ | १५१.३२ | ६७२.६१ | १५१.३२ | ६७५.३४ |

**तक्ता २: आर्थिक वर्ष २०१९–२०, आर्थिक वर्ष २०२०–२१ आणि आर्थिक वर्ष २०२१–२२ साठी अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०२२–२३ साठी तात्पुरते अचूक समायोजन** (रूपये कोटी)

| | | आर्थिक वर्ष २०१९–२० | | आर्थिक वर्ष २०२०–२१ | | आर्थिक वर्ष २०२१–२२ | | आर्थिक वर्ष २०२२–२३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **तपशील** | **मान्यताप्राप्त** | **निव्वळ हक्क** | **मान्यताप्राप्त** | **निव्वळ हक्क** | **मान्यताप्राप्त** | **निव्वळ हक्क** | **मान्यताप्राप्त** | **अंदाज** |
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | २३०.१२ | २४५.१६ | १८५.९७ | २०८.०३ | १९२.९१ | २९१.०६ | १९८.४७ | २२३.५९ |
| २ | घसारा | १५५.५२ | १५०.०३ | १७६.४६ | १७९.८७ | १८८.१२ | २०२.८५ | १९९.८२ | २२५.८७ |
| ३ | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | १०९.६४ | ९८.५७ | १२८.०५ | १०८.७० | १३०.२५ | ११९.६३ | १३१.४८ | १३६.६२ |
| ४ | पुनर्वित्तपुरवठा आणि इतर वित्तीय शुल्क | ०.०० | ३.२२ | ०.०० | ०.१५ | ०.०० | ०.१६ | ०.०० | ०.०० |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १३.५८ | १०.५५ | १३.१४ | १०.०९ | १५.३६ | १२.२५ | १५.९५ | १६.२७ |
| ६ | प्राप्तीकर | ३३.३७ | ३६.३४ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | आपत्कालीन साठ्यात योगदान | ९.०८ | ९.१५ | १०.६४ | १०.१३ | ११.७४ | ११.९५ | १२.१२ | १२.८८ |
| **अ** | **एकूण महसुली खर्च** | **५५१.३१** | **५५३.०१** | **५१४.२७** | **५१६.९७** | **५३८.३९** | **६३७.८९** | **५५७.८५** | **६१५.२३** |
| ८ | अधिक: भागभांडवला वरील परतावा | १९७.७१ | १९३.६२ | २४३.४३ | २६४.८५ | २५८.४७ | २९७.३१ | २७३.५८ | २९९.१४ |
| ९ | अधिक: उपलब्धता प्रोत्साहन | ०.०० | ५.५८ | | | | | | |
| **ब** | **एकूण महसुली आवश्यकता** | **७४९.०३** | **७५२.२१** | **७५७.७१** | **७८१.८२** | **७९६.८६** | **९३५.२०** | **८३१.४२** | **९१४.३८** |
| १० | पारेषणशुल्का पासून महसूल | ७०३.२० | ७०३.७२ | ६३६.६० | ६३७.१२ | ७८२.४८ | ७८२.५२ | ८१६.२१ | ८१६.२४ |
| ११ | वजा रोख सवलत | | –०.६६ | | –०.८५ | | –०.९४ | | |
| १२ | दरेतर उत्पन्न आणि इतर उद्योगांमधून उत्पन्न | १२.८९ | १४.९८ | १३.५८ | २३.८८ | १४.३७ | ३०.०८ | १५.२१ | ३०.०८ |
| **क** | **एकूण महसूल** | **७१६.०९** | **७१८.०४** | **६५०.१८** | **६६०.१५** | **७९६.८५** | **८११.६६** | **८३१.४२** | **८४६.३२** |
| **ड** | **महसूल तफावत/ (अतिरिक्त) = (ब–क)** | **३२.९८** | **३४.१७** | **१०७.५०** | **१२१.६७** | | **१२३.५४** | | **६८.०६** |

**तक्ता ३: आर्थिक वर्ष २०२३–२४ ते आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी एकूण महसुली आवश्यकतेचा सुधारित अंदाज** (रूपये कोटी)

| **अनु क्र.** | **तपशील** | **आर्थिक वर्ष २०२३–२४** | **आर्थिक वर्ष २०२४–२५** |
|---|---|---|---|
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | २३५.३७ | २४८.७५ |
| २ | घसारा | २५६.५७ | २८३.८९ |
| ३ | दीर्घकालीन भांडवलावर व्याज | १५८.०७ | १७३.०४ |
| ४ | खेळत्या भांडवलावर व्याज | २४.७६ | २१.०८ |
| ५ | आपत्कालीन साठ्यात योगदान | १४.९८ | १६.६६ |
| **अ** | **एकूण महसुली खर्च** | **६८९.७५** | **७४३.४३** |
| ६ | भागभांडवलावरील परतावा | ३३७.६८ | ३७१.९८ |
| **ब** | **संपूर्ण एकूण महसुली आवश्यकता** | **१०२७.४३** | **१११५.४१** |
| | **पारेषण शुल्क वगळता इतर महसूल** | | |
| ७ | दरेतर उत्पन्न | ३०.०८ | ३०.०८ |
| ८ | इतर उद्योगांमधून उत्पन्न | ०.०० | ०.०० |
| **क** | **एकूण महसूल** | **३०.०८** | **३०.०८** |
| **ड** | **एकूण महसुल आवश्यकता (ब–क)** | **९९७.३५** | **१०८५.३३** |
| इ | पुनर्विलोकन आदेशाचा परिणाम (प्रकरण क्र. २०२० चा ९५) | ४.७८ | |
| ई | प्रस्तुत याचिकेत पुनर्स्थापित केलेल्या आधीच्या परवानगी न दिलेल्या भांडवलीकरणाचा प्रभाव | ७.८९ | |
| प | ४०० केव्ही विक्रोळी प्रकल्प बंद झाल्यामुळे शिल्लक दावे | ७८.२८ | |
| फ | आर्थिक वर्ष २०२२–२३ पर्यंत पुढे नेण्याच्या खर्चासह मागील वसुली | ३७१.४४ | |
| **ज** | **निव्वळ एकूण महसुली आवश्यकता (डी+इ+ई+प+फ)** | **१४५९.७५** | **१०८५.३३** |

४. तपशीलवार याचिका दस्तावेज आणि कार्यकारी सारांश टाटा पॉवर वेबसाइट https://www.tatapower.com/regulatory/regulatory-mumbai.aspx येथे उपलब्ध आहेत आणि आयोगाच्या वेबसाइटवर www.merc.gov.in येथे देखील, डाऊनलोड करण्यायोग्य स्वरूपात (मोफत) उपलब्ध आहे.

५. खालील कागदपत्रांच्या प्रती टाटा पॉवर–टीच्या कार्यालयाकडून लेखी विनंतीद्वारे मिळवता येऊ शकतील:
अ. याचिकेचा कार्यकारी सारांश (मोफत, मराठी/ इंग्रजी मध्ये).
ब. तपशीलवार याचिका दस्तावेज सीडीसोबत (इंग्रजी मध्ये) (रोख/ डीडी/ धनादेशाद्वारे १००/– रूपयांचे शुल्क भरुन दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड च्या नावे मुंबई येथे देय)
क. तपशीलवार याचिका दस्तावेज (इंग्रजी मध्ये) (५०/– रूपयांचे शुल्क प्रदान करून).
ड. तपशीलवार याचिका दस्तावेजांची सीडी (इंग्रजी मध्ये) (५०/– रूपयांचे शुल्क प्रदान करून)

| **कार्यालय** | **पत्ता** | **दूरध्वनी क्र..** |
|---|---|---|
| नोंदणीकृत कार्यालय | श्री. रवी ॲन्टोनी, दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई– ४०००01. | दूरध्वनी: (९१ २२) ६६६५ ८२८२ |
| मुख्यालय | श्री. विक्रांत आंबोळे, दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, कॉर्पोरेट सेंटर 'ए' ब्लॉक, चौथा मजला, कर्नाक रिसिव्हिंग स्टेशन, ३४, संत तुकाराम रोड, कर्नाक बंदर, मुंबई– ४००००९. | दूरध्वनी: (९१ २२) ६७१७ १९४६ |
| धारावी | श्री. गणेश तावरे, दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, शालीमार इंडस्ट्रियल इस्टेटजवळ, माटुंगा (पश्चिम), मुंबई– ४०००१९. | दूरध्वनी: (९१ २२) ६७१७ २४०४ |
| बॅकबे | सौ. अपूर्वा शिंदे, दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॅकबे रिसीव्हींग स्टेशन, १४८, लेफ्टनंट जनरल जे. भोसले मार्ग, नरिमन पॉइण्ट, मुंबई ४०० ०२१ | दूरध्वनी: (९१ २२) ६७१७ २९३५ |

६. आयोगाने टाटा पॉवर–टी ला या सूचनेद्वारे वरील याचिकेवर जनतेकडून सूचना/हरकती मागवण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकाशित केलेल्या सार्वजनिक सूचनेला अनुसरुन, सूचना/हरकती नोंदवण्याची इच्छा असलेली प्रत्येक व्यक्ती आपल्या सूचना/हरकती आयोगाच्या वेबसाइटवर (www.merc.gov.in/e-public-consultation) (इंग्रजी किंवा मराठी भाषेत लिखित स्वरूपात) 'ई–पब्लिक कन्सल्टेशन' टॅबद्वारे अपलोड करू शकतात. उपलब्ध करुन दिलेल्या ह्या सुविधेमध्ये कोणतीही अडचण आल्यास, संबंधित भागधारक आयोगाच्या कार्यालयाशी मोबाईल क्रमांक: ८९२८०७१५२२ किंवा ईमेल आयडी: suggestions@merc.gov.in वर सर्व कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी १० ते संध्याकाळी ६ दरम्यान संपर्क साधू शकतात.

७. ज्या व्यक्तीने **'ई–पब्लिक कन्सल्टेशन'** टॅबवर सूचना/ हरकती अपलोड केल्या आहेत त्या पुन्हा छापील स्वरुपात दाखल करण्याची गरज नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यम उपलब्ध नाही ते त्यांच्या सूचना/हरकती छापील स्वरुपात **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, केंद्र क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई–४०० ००५** यांना संबोधित करुन , **सौ. स्वाती आर. मेहेंदळे, दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॅकबे रिसीव्हिंग स्टेशन, १४८ लेफ्टनंट जनरल जे भोसले मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१** यांच्या नावे सेवेच्या पुराव्यासह नोंदवू शकतात. **दिनांक १८ जानेवारी २०२३** रोजी संध्याकाळी ५ वाजल्यानंतर प्राप्त होणा–या सूचना आणि/किंवा हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. इतर कोणत्याही पद्धतीने दाखल केलेल्या सूचना/ हरकतींचा विचार केला जाणार नाही.

८. टाटा पॉवर–टी प्राप्त झालेल्या प्रत्येक सूचना/हरकतींना ती मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत उत्तर देईल, ते **दिनांक १८ जानेवारी, २०२३** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व सूचना/हरकतींना **दिनांक २१ जानेवारी, २०२३** पेक्षा अधिक नसेल. टाटा पॉवर–टी ने दिलेल्या प्रतिसादांवर, संबधित व्यक्ती, आपल्या पुरवण्या ई–सार्वजनिक (ऑनलाइन) सुनावणी दरम्यान किंवा **दिनांक २८ जानेवारी, २०२३** पर्यंत सादर करु शकतात.

९. मुद्दा क्रमांक ६ मध्ये दिल्याप्रमाणे ज्या व्यक्तीने आपली सूचना/हरकत सादर केली आहे आणि त्यांना ई–सार्वजनिक सुनावणीदरम्यान व्यक्तीगत स्वरूपात सुनावणी हवी असल्यास, त्यांनी/तिने सूचना/हरकती नोंदवताना त्याचा उल्लेख केला पाहिजे. अशा वेळी, वैध ईमेल आयडी आणि मोबाइल क्रमांक सादर करणे अनिवार्य असेल. आयोग आपल्या अधिकारांतर्गत अशा व्यक्तीला दिनांक **२५ जानेवारी, २०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता** व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या ई–सार्वजनिक सुनावणीमध्ये आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल, ज्यासाठी कोणतीही वेगळी सूचना दिली जाणार नाही.

१०. ई–सार्वजनिक सुनावणीला उपस्थित राहणा–या सर्व व्यक्तींनी आयोगाने दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ रोजी जारी केलेल्या निर्देशांचे (आयोगासमोरील याचिकांच्या ई–फाइलिंग आणि ई–सुनावणीसाठीच्या कार्यपद्धती आणि नियमांवली) पालन करावे.

**(स्वाती मेहेंदळे)**
**मुख्य– नियामक**
**दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड.**

**स्थान: मुंबई**
**दिनांक: २८ डिसेंबर २०२२**